नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ११/०६/२०२६ (गुरूवार )

## मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी चारगाव, पेंच येथील MARVEL कृत्रिम बुध्दीमत्ता प्रणाली द्वारे लावलेल्या कॅमेऱ्यांची केली पाहणी

**MARVEL ( Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement )** ने विदर्भातील वनक्षेत्राच्या भागांमध्ये AI सक्षम देखरेख कॅमेरे बसविले आहे. त्या अनुषंगाने आज दिनांक ११/०६/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी पोलीस स्टेशन देवलापार हद्दीतील चारगाव, पेंच येथे लावलेल्या AI सक्षम देखरेख कॅमऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली.

सदर प्रकल्पांच्या माध्यमातुन वनक्षेत्रालगत गावांमध्ये वन्यप्राण्यांची हालचाल वेळेवर ओळखणे शक्य होत असुन नागरिकांना तात्काळ इशारे देण्याची सुविध उपलब्ध झाली आहे. यामुळे माणूस – वन्यप्राणी यांच्यातील संघर्षात लक्षणीय घट होत असल्याचे निदर्शनास आले आहे.हा उपक्रम स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेसोबतच वन्यजीव संवर्धनासाठीही अत्यंत उपयुक्त ठरत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वनक्षेत्रातील सुरक्षा अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**सदर वेळी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्यासह श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, वन विभागाचे अधिकारी, देवलापार पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी सपोनि श्री नारायण तुरकुंडे आणि MARVEL चे अधिकारी श्री साईकृष्ण बुडामगुंटा हजर होते.**


INDO POWER
क्रेन सर्विस






INDO POWER
देविशा क्रेन सर्विस
20T
14T
9T
13T

# पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) च्या गुन्हयातील गोवंश जनावराची कत्तलीकरीता तस्करी/वाहतुक करणाऱ्या टोळीतील पाहीजे आरोपीला अटक,

पोलीस स्टेशन भिवापुर :— **नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत पोलीस स्टेशन भिवापुर येथे अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकामी तस्करी करणाऱ्या टोळीचा प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण ५ आरोपीतांच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे श्रीकांत यादवराव चौधरी,वय २७ वर्ष,रा.नागतरोली, ता. भिवापूर टोळी सदस्य आणि टोळी सदस्य अशा ५ आरोपीची टोळी आहे.**

दिनांक ०५/०२/२०२६ रोजी भिवापुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद आहे. त्याची हकीकत याप्रमाणे आहे की, टाटा कंपनीचे झेनॉन पिकअप वाहन क्र एम.एच. ३४ ए. बी. ६९६४ चा चालक नामे श्रीकांत उर्फ छोटू यादवराव चौधरी, वय २९ वर्षे, रा. नागतरोली ता. भिवापूर याने त्याच्या वाहनाच्या डाल्यामध्ये ०८ गोवंश जनावरे जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला पायाला आखुड दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहनाच्या डाल्यामध्ये कोंबुन कत्तलीकरिता अवैधपणे जाणीवपुर्वक वाहतुक करत असताना भरधाव वेगााने व निष्काळजीपणे बेदरकारपणे त्याच्या ताब्यातील वाहन चालवुन राष्ट्रीय महामार्ग क्रं. ३५३ ड वरील मानोरा शिवार येथील भिवापूर ते उमरेड कडे जाणाऱ्या रोडच्या कडेला असलेल्या मोठया झाडाला जबर धडक देवुन अपघात केला होता. वाहनातील काही जनावरे जखमी झाले तर काही जनावरे मरण होते. सदर प्रकरणी पोलीस ठाणे भिवापूर अप.क्र. ७८/२६ कलम ३२५,२८१(१)भा.न्या.सं. २३ सहकलम ११(१), (ड), (ई) (फ) प्राणी छळ प्रति.अधि.सहकलम ५,९ महा.पशुसंरक्षण अधि .सहकलम ११८ म.पो.का. सह कलम ३ (१), (ii), ३ (२), ३ (४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयात पोलीसांनी टोळीप्रमुख नामे **१) टोळी प्रमुख आरोपी १) श्रीकांत यादवराव चौधरी,वय २७ वर्ष,रा. नागतरोली ता. भिवापूर टोळी सदस्य आरोपी २) प्रफुल उर्फ भोला हेमराज चौधरी,वय २३**

वर्ष, रा. नागतरोली ता. भिवापूर जि. नागपूर आणि ३) नामदेव गोपीचंद सतीबावणे,वय ३८ वर्षे,रा. आमगाव ता. पवणी,जि. भंडारा  यांना यापुर्वी अटक केलेले आहे.

दिनांक ११/०६/२०२६ रोजी सकाळी पाचगाव पोलीसांना सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी अजय धनराज चौधरी, वय २९ वर्ष, रा. नागतरोडी, ता. भिवापूर जि. नागपुर हा भिवापूर वरुन नागपुर येथे जात असल्याची गोपनीय माहीती मिळाल्यावरून पाचगाव पोलीसांनी तात्काळ चांपा टोल नाका येथे नाकाबंदी करून सापळा रचुन सदर आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीला अटक करण्यात आली आहे.




अजय धनराज चौधरी

# करवाही गावात दारूबंदी मोहिमेसाठी घेण्यात आली पोलीस पाटील, सरपंच, महिला मंडळाच्या सदस्य तसेच नागरिकांची संयुक्त बैठक

**पोलीस स्टेशन देवलापार** :– दिनांक ०८/०६/२०२६ रोजी करवाही येथील ग्रामपंचायत कार्यालयात देवलापार पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री. नारायण तूरकुंडे यांच्या उपस्थितीत गावातील पोलीस पाटील, सरपंच, महिला मंडळाच्या सदस्य तसेच नागरिकांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीत करवाही गावातील अवैध दारूविक्रीला आळा घालण्यासाठी करण्यात आलेल्या कारवायांची माहिती देण्यात आली. अवैध दारू विक्रेत्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून, यापुढे गावात कोणत्याही प्रकारची अवैध दारूविक्री होऊ नये यासाठी ग्रामस्थ, महिला व युवकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत महिलांनी व युवकांनी गाव दारूमुक्त करण्यासाठी पुढाकार घेतला. तसेच गावात कोणीही अवैध दारूविक्री किंवा दारूचा पुरवठा करत असल्याची माहिती मिळाल्यास ती तात्काळ पोलीस स्टेशनला कळविण्याचे आवाहन करण्यात आले. माहिती प्राप्त होताच संबंधितांवर त्वरित व योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. सदर वेळी श्री नारायण तुरकुंडे यांनी दारू, गांजा व इतर अंमली पदार्थांच्या व्यसनामुळे तरुणांच्या जीवनावर होणारे दुष्परिणाम, कौटुंबिक वाद–विवाद आणि कुटुंबावर होणारे नकारात्मक परिणाम याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. गावातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करणे, व्यसनाधीनता कमी करणे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.बैठकीच्या शेवटी उपस्थित ग्रामस्थांनी गावात दारू व इतर नशेच्या पदार्थांवर बंदी कायम ठेवण्यासाठी सहकार्य करण्याची शपथ घेतली. महिलांनी दाखविलेली जागरूकता आणि सहभाग हा कौतुकास्पद असुन समाजपरिवर्तनाचा प्रभावी आधार आहे.




# अरोली पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध जुगार व्यवसायातील सराईत गुन्हेगार सुरेश गणपत गजभिये याला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन अरोली हदद्दीतील अवैध जुगार व्यवसायात सक्रिय आरोपी **नामे सुरेश गणपत गजभिये, वय ५४ वर्ष, रा. टाकळघाट ता. हिंगणा, ह. मु. निमखेडा ता. मौदा, जि. नागपूर** यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांनी हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे **सुरेश गणपत गजभिये, वय ५४ वर्ष, रा. टाकळघाट ता. हिंगणा, ह. मु. निमखेडा ता. मौदा, जि. नागपूर** याचेवर अवैध जुगाराचे ०३ **गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत असुन नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलीसांनी त्यांचेविरूध्द वेळोवेळी कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा नमुद आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच त्याच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे गुन्हेगार **सुरेश गणपत गजभिये, वय ५४ वर्ष, रा. टाकळघाट ता. हिंगणा, ह. मु. निमखेडा ता. मौदा, जि. नागपूर** याचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव अरोली पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी यास **१ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**




**हद्दपार आरोपी सुरेश गणपत गजभिये,**

# खापा पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखा वरील २ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हदद्तीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी **कं १) श्रीकृष्ण दिवाकर सहारे, वय ३१ वर्षे, रा निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपुर आणि सराईत गुन्हेगार , क्रं २) राजकुमार अन्नाजी चौधरी, वय ३८ वर्ष, रा. वाकोडी, ता. सावनेर, जि. नागपुर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांनी हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **कं १) श्रीकृष्ण दिवाकर सहारे, वय ३१ वर्षे, रा निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपुर आणि सराईत गुन्हेगार याचे** अवैध दारू बाबत **अनेक गुन्हे नोंद** आहे. तसेच **क्रं २) राजकुमार अन्नाजी चौधरी, वय ३८ वर्ष, रा. वाकोडी, ता. सावनेर, जि. नागपुर याचे वर चोरी, रेती चोरी असे मालमत्तेविरूध्दचे अनेक गुन्हे नोंद आहे.** नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद दोन्ही आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **कं १) श्रीकृष्ण दिवाकर सहारे, वय ३१ वर्षे, रा निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपुर याला**

**१ महीन्यांकरीता आणि २) राजकुमार अन्नाजी चौधरी, वय ३८ वर्ष, रा. वाकोडी, ता. सावनेर, जि. नागपुर** आरोपी याला **२ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**




**हद्दपार आरोपी श्रीकृष्ण दिवाकर सहारे**



**हद्दपार आरोपी राजकुमार अन्नाजी चौधरी**

# अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद,
# ५२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक १०/०६/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, ब्हीरमबाबा देवस्थान काटोल रोड येथून मोटरसायकलने एक इसम अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ बहीरमबाबा देवस्थान, काटोल रोड, कोढांळी येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बीजी कंपनीची इलेक्ट्रीक बाइक मोटरसायकल क्र एम एच ४०/डी एच ९५३३ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असतो देशी दारू च्या ५० निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे** योगेश रमेश वरूडकर, वय ३२ वर्ष, रा. शनिचरापेठ कोंढाळी हा **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या ५० निपा किंमती २०००/—रूपये आणि किंमती बीजी कंपनीची इलेक्ट्रीक बाइक मोटरसायकल क्र एम एच ४०/डी एच ९५३३ किंमती ५०,०००/—रू असा एकुण किंमती ५२,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी योगेश रमेश वरूडकर, वय ३२ वर्ष, रा. शनिचरापेठ कोंढाळी याचेविरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# तारसा रोड वरील स्ट्रीट लाईट सुरू करण्यासाठी पत्रव्यवहार केल्याबाबत..

दिनांक १०/०६/२०२६ चे एका वृत्तपत्रात तारसा रोड की स्ट्रीट लाईट अबतक बंद,नागरिको मे नाराजगी अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, पोलीस स्टेशन कन्हान यांच्याकडुन नगर परिषद, कन्हान च्या संबधीत विभागाला तांत्रिक बिघाड दुरूस्त करून लवकरात लवकर तारसा रोडवरील स्ट्रीट लाईट सुरू करण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक १०/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, मोहाफुल दारू, वाहन असा एकुण ६१,३७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे १) बादल राजन मेश्राम, वय ३८ वर्ष, रा. तास, ता. भिवापुर, जि. नागपुर २) अनिल सुरभी सोळंखी, वय ३५ वर्ष, रा. गरडापार, ता. भिवापुर, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे** १) विनोद थवन जाधव, वय ३६ वर्ष, रा. मांडवा २) मनोज शंकर नागपुरे, वय ३६ वर्ष, रा. बाम्हणी उमरेड ३) अनिकेत वंसतराव चहांदे, वय ३२ वर्ष, रा. वानोडा देणी, ह. मु. उमरेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी दिलीप तेजराम कोहळे, रा. चानपा सावनेर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी रोशन अरुन डेकाटे, वय २८ वर्ष, रा. खापा, ता. सावनेर, जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे योगेश रमेश वरूडकर, वय ३२ वर्ष, रा. शनिचरापेठ कोंढाळी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे जसविरसिंग जतनसिंग भोंड, रा. पंचवटी काटोल, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे १) संदिप बंडु वानखेडे, वय ३८ वर्ष, रा. रामनगर लोहे ले आउट, कन्हान २) निखील रमेश भुते, वय ३१ वर्ष, रा. महाजन नगर, कन्हान यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २१९६० मिली देशी दारू, ११ मोहाफुल दारू, ०१ मोटरसायकल असा एकुण ६१,३७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने